
१०२५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. नं. ५३२



१
539
काव्य
REFBK-0002879
REFBK-0002879

श्रीमति कमलाबाई देशपांडे
यशवंत नरसिंह केळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

# गीत-द्विदल

( भाग १ ला )

श्रीमति कमलाबाई देशपांडे
यशवंत नरसिंह केळकर

REFBK-0002879
REFBK-0002879

१९२५

किंमत ८ आणे

प्रकाशक
यशवंत नरसिंह केळकर
५५४ सदाशिव, पुणे.

[ प्रकाशकाकडे सर्व हक्क ]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणे.

सं.काव्य ७७८

# प्रास्ताविक

आज नव्या वर्षाच्या मुहूर्तानें सदर छोटेसें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

हल्लींच्या रूढ पद्धतीप्रमाणें त्याला एकाद्या मोठ्या मनुष्याच्या प्रस्तावनारूप शिफारसीचा आधार दिलेला नाहीं. कारण—

वाणी यदैव सरसा मनरंजयित्री
न प्रार्थनेह रसविदां अवधानदानम्

म्हणजे 'वाणी' सरस असेल तर रसिकांना अवधान देण्याविषयीं विनंति करण्याचें कारण नाहीं. म्हणजेच उलट ती तशी नसेल तर विनंति करूनहि कांहीं उपयोग होणार नाहीं हें उघड आहे. असो.

सदर पुस्तकाच्या मूळ कल्पनेपासून तें छापून होईपर्यंत सर्व तऱ्हेनें आमचे मित्र प्रो॰ हर्षे—टिळक महाविद्यालय, यांचें फार सहाय्य झालें हें नमूद करणें औपचारिक दिसलें तरी युक्त होय. छपाईचें काम किती सुरेख झालें आहे याची साक्ष या पुस्तकाचे वाचकच देतील.

पुणें,
१ जानेवारी १९२५

# गीत–द्विदल

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नं.
ता.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नं. ........
ता. ........
ठाणे.

श्रीमति कमलाबाई देशपांडे

दा. क्र. २८५८. दिनांक ७४४ २८-२-३८ ६५८३ २७११५८

## शबरी

[नेहमींच्या कथानकाहून भिन्न; परंतु एका हरिदासाच्या कथेंत ऐकिलेलें खालील कथानक आहे.]

(चालः—जो कृपावंत धीमंत०)

ज्या स्थलीं विपुल पशुतती रात्रदिन करी आश्रयाला।
तो गिरी रम्य दिसला।
सह्याद्रिपर्वतावरी, निशाचर येति शिकारीला।
तंव समूदाय आला।
शबरनायकाला असे कन्यका एक शबरिबाला।
सद्गुणी बहू कोमला।
जणुं लावण्याची खाणी।
मंजुळ बहु वाटे वाणी।
तातासह हिंडे रानीं
पाहिलें एक कौतुका,
तिनें चुकविलें जन्ममरणा॥
तुज अम्ही करूं नमना॥
श्रीराम! शबरिउद्धारि! भक्त कैवारि! जगज्जनना!॥धृ०
एक रम्य गुहा देखिली। स्फटिकमय शिळा
असति तिजला।
चालली आंत बाला।
तों राममूर्ति देखिली। पुढें हनुमान सिताबाई
तप करी अप्सरा ही।

जातांचि उद्भवें प्रेम । रम्य बहु ध्यान पाहुनीया ।
मनिं म्हणे जन्म वांया ।
चित्तवृत्ति तन्मय झाली ।
जों मूर्ति नयनिं पाहिली ।
भूक झोंप हरपुनि गेली ।
अप्सरा ध्यान उतरतां । शबर कन्यका पाहि नयना
तुज अम्ही करूं नमना० ॥ २ ॥
" तूं कोण कशी आलीस । नांवं तव काय
सांग मजला । "
" मी असें शबरबाला । "
" तूं असति कोण देवता । प्रभू हा कोण ?
तारि मजला ।
दीन मी शरण तुजला । "
" हा ईश प्रभू जगदीश । अयोध्याधीश म्हणति याला ।
भवसागर--सेतु झाला "
मी असे एक पामर ।
उद्धरी मला मुनिवर ।
तो तुला दावितें चल ।
मलप्रभा नदीसान्निधीं । मृकण्डू करी पुरश्चरणा ॥
तुज अम्ही करूं नमना० ॥ ३ ॥

नेउनी चरणिं घातली। "मुनिवरा तारि, शरण आलें।"
मुनिवरें अभय दिधलें।
तुं शांत मानसीं रहा। राम दंण्डकारण्यि आले।
येतील येथ बाळे।
देखतां वचन भास्करा। शबरिहृत्कमल फुले, डोले।
हर्षाश्रु नेत्रि आले।
मानसीं विचारा करी।
जरि प्रभू येति झडकरी।
सत्कार कसा करुं तरी।
तों बदरिवृक्ष देखिला। हर्षिता होय कमलनयना॥
तुज अम्ही करूं नमना० ॥४॥
मनिं म्हणे बदरिचीं फळें अर्पुया रामचंद्रप्रभुला।
नच भेद ईश्वराला।
लगबगां चढे भरभरा। तोडिते फळें राघवाला।
चाखुनी बघे बाला।
जरि आम्लकटू राहील। राग येईल जगत्पतिला।
वाटलें अल्पमतिला।
केळिचा द्रोण ती करी।
त्यामधें फळें तीं भरी।
प्रभुचरणीं अर्पण करी।
सावित्रीतनया म्हणे। अपणही धरूं ईशचरणा॥
तुज अम्ही करूं नमना० ॥५॥

ऑगस्ट १९१०

नं. ....... ता. .......

## बालकास पाहून !

( चाल:—गिरिवर माझ्या मी चढतां० )

बालरवी हा जणुं आला ।
प्रभा शोभवी वदनाला ।
कोमल निर्मल दीप्तीला ।
सर्वे घेउनी कीं नटला ।
प्रफुल्लवीतो हृत्कमळा ।
प्रखर मनोहर परि झाला ।
आनंदवितो ।
शांती देतो ।
स्वयेंहि बनतो ।
तसाचि निर्गुण परि असतो ।
जगताला मोहित करितो ॥

२

निबिडतमांतरिं कां मजला ।
तारक तारा हा झाला ? ।
असह्य दीर्घ निराशेला ।
आशातंतू सांपडला ? ।

अगम्य मार्गा क्रमण्याला ।
दूत प्रभूनें कीं दिधला ।
काय असावें ।
वा समजावें ।
काय वदावें ।
नकळे मजला दीनेला ।
अगम्य प्रभुची ही लीला ॥

२

अर्धस्फुट हें सुम दिसतें ।
स्वेच्छेनें हांसत वसतें ।
भीति दुःख ह्या नच ठावें ।
सदा रमावें खेळावें ।
कांहीं होवो जगताचें ।
भान तयाला ना त्याचें ।
अतीव कोमल ।
निर्भय निर्मल ।
कीं गंगाजल ।
योग्यांनींही येथोनी ।
बोध पहावा शोधोनी ।

४

अर्धस्फुट मम पुष्प असो ।
असेंचि राहो, नच विकसो ।
पूर्णत्वा नच जाऊं दे ।
असेंचि मजला पाहूं दे ।
पूर्णत्वाच्या पलीकडे ।
नष्टत्वाचे उभे कडे ।
पुष्प उमललें ।
फुललें, डुललें ।
पूर्ण विकसलें ।
पूर्णत्वें सुकुनी गेलें ।
पंचत्वा जाउनि मिळलें ।।

५

जें जें येतें उदयाला ।
अस्त तयाला ठरलेला ।
चंद्रबिंब तें बीजेला ।
उगवे लागे वाढीला ।
मिळलें जों पूर्णत्वाला ।
क्षयें ग्रासिलें चंद्राला ।

ग्रासुनि गिळलें।
गेलें गेलें।
लुप्त जाहलें।
नमस्कार तुज पूर्णत्वा !।
हात जोडितें तुला अतां ॥

६

सान बाळ मम राहूं दे।
असाचि मजला पाहूं दे।
राहो याचा आनंद।
खेळो ऐसा स्वच्छंद।
दुःखी जगताचा वारा।
नसो तया या सुकुमारा;
अर्धस्फुट जरि।
पुरे मला तरि।
सौख्याची खरि।
वेळ कुमारा हीच असे।
थोरपणांतरिं सौख्य नसे ॥

१५ जुलै १९१३.

# शेवटचा संदेश

[Mrs. Heamans च्या Bingen on the Rhine या कवितेवरून खालील कविता लिहिण्याची स्फूर्ति झाली.]

(दिंडी.)

स्वजन दूरी राहिले दूर देशीं ।
एकलाची पातलासे विदेशीं ।
देशकार्या लढण्यास सिद्ध झाला ।
'उदयभानू' अस्तास हा निघाला ॥ १

दैवयोगें पाहिलें मित्ररायें ।
घात झाला, समजलें तत्क्षणीं हें ।
शीघ्र उचलोनी पार्श्ववृक्षभागीं ।
आणियेला शुश्रूषे तयालागीं ॥

शीर अंकीं ठेविलें, हस्त हस्तीं-।
घेवुनीया लाविली स्थीर दृष्टी ।
श्रांत वदनीं त्या कंठ दाटलेला ।
हांक मारी हळुहळू मूर्छिताला ॥ ३

हांक प्रेमाची हीच दिव्यवल्ली ।
जणों हृदयांतरिं खोल खोल गेली ।
स्वगुण दावी ती पूर्वस्मृती आली ।
नेत्र उघडी पाहतो भोंवतालीं ॥ ४

कोण, कोठें पातलों, काय झालें, ।
सर्व गोष्टींचें भान तदा आलें ।
पुढें आहे होणार काय हेंही ।
वार मर्मी पाहुनी मनीं येई ॥ ५

कळुनि आलें सहवास संपलाची ।
जगाचा ह्या; मी भवाचा प्रवासी ।
परतण्याचा तो काल जवळ आला ।
उदयभानू अस्तास हा निघाला ॥ ६

प्रथम प्रहरांतचि सूर्य मावळावा
निघे तेवी सोडून ह्या जगाला ।
शताब्दाची ना पंचवीस झालीं ।
तोंच काळाची हांक ऐकियेली ॥ ७

मना वाटे जाणार पुन्हां नाहीं ।
स्वदेशाला भेटेन तयांनाही ।
जयासंगें सौख्यांत काल गेला ।
विचारानें ह्या कंठ भरुनि आला ॥ ८

काल बाल्याचा सुखद काढिलेला ।
पितृच्छत्रीं जो शिक्षणांत गेला ।
भवाब्धीचा आरंभ जिथें झाला ।
फिरुनि फिरुनी आठवी त्या दिनाला ॥ ९

गलितशक्ती ना शब्द येत वाचे ।
त्राण नाहीं राहिलें बोलण्याचें ।

परी इच्छा उत्कटा शेवटीची–।
साह्य होई. शक्ति दे बोलण्याची ॥ १०
" मित्रराया," कांपरा कंठ झाला।
"जरी जासी परतोनि स्वगेहाला।
सांग सर्व वृत्तांत जाहलेला।
शांतवावें वा तूंचि दुःखिताला ॥ ११
हिंदभूचे सत्पुत्र शूर साचे।
नांव ऐसें आमुचें गाजतें जें।
खरें आहे जगतास दाखवीलें।
फिरुनि फिरुनी तें उज्ज्वलीत केलें ॥ १२
सांग मातापितरांस पाळिलेला।
बाळ जो कीं लालसा मानियेला।
आर्यभूच्या गौरवा राखण्याला।
ईशइच्छेनें आज खर्च झाला ॥ १३
शोक, ठावें, अनिवार तुम्हां होई।
घांस तोंडींचा आज देव नेई।
परी कर्तव्यीं दक्ष पुत्र झाला।
समाधानाचा किरण राहियेला ॥ १४
नमन माझें अंतिचें मान्य व्हावें।
सान बाळा, ऐसेंच आठवावें।
अजाणत्वें जाहली चूक कांहीं।
क्षमा त्याची बालका आज व्हावी ॥ १५

बंधुप्रेमा ही ठेव ईश्वराची।
लाभते ज्यां मानिती धन्य त्याची।
मींहि अनुभूती सेविली तयाची।
जयांसंगें त्या विनति शेवटीची॥ १६

देशकार्यातें जिणें वाहियेलें।
मायबापांचें ऋण न फेडियेलें।
फेडण्याचा तुम्हांस भार झाला।
नाद माझा पाहिजे पूर्ण केला॥ १७

तातमातेला सौख्य द्यावयाचें।
काज नाहीं तुम्हांस सांगण्याचें।
विसर पाडुनि मम शांत करायाची।
भाउरायाची विनति शेवटीची॥ १८

वीर दुसरे घेऊन जयश्रीला।
जधीं करिती नगरांत प्रवेशाला।
साभिमानें टाकोन शोक पाही।
शपथ माझी त्यांकडे तुला ताई !॥ १९

विजय पाहोनी हर्ष तुला व्हावा।
मानि अभिमाना ठेवि याच भावा।
बंधु होता ऐसाच तव शिपाई।
यशाचें ह्या अंशतः श्रेय घेई॥ २०

सर्व झाले संदेश सांगुनीया।
तरी आहे येवढा राहियेला।

ऐकुनीया दे आज निरोपाला ।
कुणा सांगें तें सांगणें कशाला ॥ २१

काय सांगूं ! मन्मती भ्रमुनि जाई ।
भाव माझा वचनांत येत नाहीं ।
सांग होतें तव स्मरण मला अंतीं ।
भाव सारा कळवील शब्दपंक्ती ॥ २२

भावभावांचें ऐक्य जेथ होई ।
वचनबंधाचें काज उरत नाहीं ।
तिला माझ्या ह्या मुग्ध निरोपाचा ।
अर्थ कैसा ठाउकें ह्या वयाचा” ॥ २३

शब्द नुमटे वाक्श्रमें श्रांत होई ।
तेज अवघें लोचनीं जमुनि येई ।
साश्रु तेजोयुत लोचनीं तयाला ।
राहियेला भावार्थ सांगियेला ॥ २४

वेळ आली, पाहिलें मित्ररायें ।
होय, खुणविलें, नेत्र भरुनि आले ।
सद्गदोनी तद्गदनिं वदन ठेलें ।
हाय दैवा चैतन्य नष्ट झालें ! ॥ २५

२१ मे १९१५.

## 'कुणास्तव कुणीतरी' वाचून !

[ रेव्ह० टिळक यांची 'कुणास्तव कुणीतरी' ही कविता वाचून खालील कविता लिहिण्याची कल्पना सुचली. ]

( पृथ्वी. )

मना ! तृषित मानसा ! क्षणभरी विचारा करी ।
निराशप्रद, निष्फला तुज कशास आशा जरी ।
तुलाचि पुरतें कळे घडत ना पुन्हां भूवरीं ।
कुणास्तव कुणीतरी सभय वाट पाहे घरीं ॥ १ ॥

जया निरखितां क्षणीं सकल त्रास चिंता हरे ।
जयें विमलदर्शनें विकलता मनाची नुरे ।
दिसो फिरुनि वाटतें नुमजुनी कळें हें जरी ।
सुहास्ययुत त्या मुखा खचित पारखी भूवरी ॥ २ ॥

असा दिवस चालला, फिरुनि, रात्र ही संपली ।
सरेल महिना तसा सकल वर्षही यापरी ।
मना तळमळे सदा पथहि तूंचि तो स्वीकरीं ।
कुणास्तव कुणीतरी तरिहि येइना भूवरी ॥ ३ ॥

चुकोनि सुपथा मना भटकलासि वेड्यापरी ।
कळे नच भलें बुरें भ्रमित वृत्ति हो बावरी ।
जरी सकल कोंदलें तम दिसे न कांहीं वरी ।
कुणास्तव कुणीतरी तुज न मार्ग दावी तरी ॥ ४ ॥

असोंचि झुरणें मना सतत प्राप्त स्वद्वृत्तिला ।
स्मरोनि मनिंच्या मनीं अखिल कल्पनासृष्टिला ।
तुझें सुखनिधान जो तव प्रकाश तो लोपला ।
असोंचि श्रम जा कुठे ! तव व्यथेस नाहीं तुला॥५॥
१९१७.

## आईविण कां कोणाचें ?

[ Mrs. Heamans च्या A mother, who hath a child at sea. या कवितेवरून कल्पना सुचून खालील कथानक कल्पिलें आहे.]

"शिवाजी राजा एका खेड्यांत रात्रीं वस्तीस उतरला आहे. इतक्यांत मोगलांचें सैन्य पकडण्यास येत आहे अशी बातमी येते व त्यामुळें गांवांतील कांहीं मंडळीसह शिवाजी रात्रींच निघून जातो. सकाळीं मोंगलांचें सैन्य येतें पण शिवाजी नाहीं हें पाहतांच तसेंच पाठलाग करीत पुढें जातें. दुपारीं दोन सैन्यांची लढाई होऊन शिवाजीचे निम्मे लोक मारले जातात. परंतु विजय मिळतो. वरील खेड्यांतील एका बाईचा मुलगा शिवाजीबरोबर गेला आहे. विजय झाला ही बातमी कळते. पण आपला मुलगा मेलेल्या निम्या लोकांत पडला का उरलेल्या निम्या लोकांतून परत येत आहे हा उलगडा न झाल्यामुळें हंसावें कीं रडावें ही भ्रांति पडलेल्या एका मातेच्या

सका[illegible]



मनःस्थितीचें वर्णन करण्याचा खालील कवितेंत प्रयत्न केला आहे."

[ आई मुलाला लढाईस जावयास निरोप देते तो प्रसंग.]

१

हांक यमाची वा भाग्याची नौबद झडली जाण्याची।
सिद्ध जाहले गडी मराठे वाट पाहती हुकुमाची ॥
पुत्रप्राणीं केंवळ वसते भाग्ययोग्यता देशाची ।
पूर्ण ठाउकें वीरप्रसू ती करी तयारी बाळाची ॥
वेळ पाहतां परि गमनाची स्नेहातिशयें गहिंवरली ।
'कओण म्हणती माया मोठी' सार्थकता त्याची कळली
हृदया आलें भरतें झालें हृदय पूर्ण लोचन भरले ।
स्नेहरसाचे मूर्तचि ओघळ गालांवरुनी ओघळले ॥
स्निग्ध जाहली दृष्टी उरली एकचि प्रतिमा पुत्राची ।
पुढें खालती मागें दिसली तन्मयता हो चित्ताची ॥
प्रेमसमाधी लागुनि गेली ज्याकरितां त्या प्राणाची ॥
मेला पुढुनी केव्हां निजुनी शुद्धबुद्ध नुरली त्याची ।
सांगा ! सांगा ! नेत्र अश्रुंनीं भरतिल ऐसे दुसऱ्याचे।
वात्सल्यानें तळमळणाऱ्या आईविण का कोणाचे ?।

२

[ मुलगा निघून गेला व मोगलांचें सैन्य त्याचा पाठलाग करीत आहे हें कळल्यानंतरची तिची अस्विष्ट स्थिति.]

हांक मारितां ये भानावर जडपद टाकी गृहाकडे।
सचिंत चित्तें गृहीं वावरे, लक्ष न लागे कशाकडे॥
तों यवनांची एक पातली तुकडी दौडत त्वेषानें।
“ गेला शिवबा पार !” निघाली पुढती रागें वेगानें॥
दूर वाजती जों त्या टापां धडधड हृदयें तों वाढे।
मनांत वाटे क्षणांत आतां दों सैन्यांची गांठ पडे॥
गांवामध्यें आली वार्ता तोंड लागलें युद्धातें।
लोक आपुले असती थोडे, परके संख्येनें मोठे॥
भिस्त काय ती शौर्यावरती उरली आतां विजयाची।
लक्ष जाहलें, मना समजलें, वेळ पातली निकराची॥
घोष तयांचा ऐकूं येतो ऐसें गमतें चित्तातें।
येथें कोणी तिशीं बोलतां, भान तियेला नच उरतें॥
सांगा! सांगा ! कर्ण बधिर हो होतिल का हे दुसऱ्याचे।
वात्सल्यानें तळमळणाऱ्या आईविण का कोणाचे ? ॥

३

[ मराठ्यांची व मोगलांची गांठ पडली असेल असें
वाटून चालू असलेल्या लढाईचा तिच्या डोळ्या-
समोरील चित्रपट व मुलास वार होत
आहे असें वाटून झालेली अंतः-
करणांतील तळमळ.]

आपण अपणां विसरुनि गेली हृदय धांवलें समरांत
रणभूमीवर जें जें चाले दिसतें वाटे चित्तांत ॥
" सान वय तरी वीरकेसरी मारि भरारी अरीवरी ।
यवन मत्तगज त्यांच्या पुढतीं निमिषार्धीं परि चुरा करी
सान पोर हा त्रास देतसे फार आपुल्या लोकांना ।
पाहुनि आला एक धांवुनी यवन धरीतो कंठाला ॥
क्षणांत आतां"–नयनापुढचा पट तुटला तो चित्राचा ।
पुढें कल्पना करितां येना हृदयाला त्या आईच्या ॥
धडकी भरली कळलें आतां त्राता एकच वेळेला ।
निस्सीमपणें त्यातें जावें शरण जोडिलें हातांला ॥
निश्वासातें सोडी दृष्टी एका मूर्तीवर खिळली ।
भरल्या कंठें शब्द न उमटे आशा देवाला कळली ॥
सांगा ! सांगा ! याहुनि दुसरी अनन्यभक्ती कोणाची ।
वात्सल्यानें तळमळणाऱ्या आईविण का कोणाची ?

## ४

[ विजय झाला पण निम्मे लोक मेले अशी बातमी गांवांत येते. आपला मुलगा परत येत आहे का रणांत पडला आहे या संशयित स्थितीचें वर्णन.]

आला जासुद घेउनि वार्ता खबर सांगतो गांवाला ।
शिवरायानें पुरता केला मोड मिळविलें विजयाला ॥
हातावरतीं शीर घेतलें कमाल केली शौर्याची ।
निम्या पथकें प्राण देउनी माळ मिळविली विजयाची ॥
उरल्या लोकां घेउनि येतो शिवबा आतां गांवांत ।
संशयलहरी उठती न कळे काय लिहियलें नशिबांत ॥
विजयोत्साहें पायीं डोई ठेवाया कां येईल ।
उलटी वार्ता किंवा त्याचा मित्र येउनी सांगेल ॥
'शूर बाळ तव उजवा माझा हात, सांगण्या शिवराया ।
येइल किंवा म्हणेल त्याचे जागीं समजे शिवबा या ॥
सुखासुखाशा हर्षनिराशा सोक्षमोक्ष अदृष्टाचा ।
लागायाचा झगडा हृदयीं भय उत्सुकता द्वंद्वाचा ॥
सांगा ! सांगा ! वर्णन त्याचें शक्य तुम्हांला वा मजला ।
आईच्या या हृदयावांचुनि अनुभूति तरी कोणाला ? ॥

१९१७.

## संध्यासमय

[ सूर्य अस्तास गेल्यानंतर थोडा वेळ आकाशांत त्याचे किरण चोहींकडे फिरणाऱ्या ढगांवर वेगवेगळे रंग चढवीत असतात. तो देखावा पाहून सुचलेले विचार खालील श्लोकांत ग्रथित केले आहेत.]

( शार्दूलविक्रीडित )

आरोहून गिरीवरी क्षणभरी, जाई रवी संप्रती।
हो अज्ञेय अदर्शनीय लपुनी अस्ताचलामागुती।
तेथोनी हृदयंगमा नवरसा फेकी जणूं अंबरीं।
तेणें तेथचि तो मनास पटतें ना दृश्य नेत्रां जरी॥१॥
आहे नील तरी मधें पसरिलीं हीं मेघखंडें किती।
वाटे कापुस पिंजुनी पसरिला आकाशमार्गांप्रती।
कीं येणार सुरांगना विहरण्या त्यांनां जणों घातली।
कौशल्यें विधिनेंच बैठक सभास्थानांत विस्तारिली॥२
नाहीं दृश्य तरी लपोनि वितरी ते रंग नानापरी।
झालें चित्रित मेघजाल अवघें, ही कोण कारागिरी।
कांहीं रम्य जनीं मनोहर गुणीं विस्तारिती वैभवा।
कांहीं शाम मधें तसेच दिसले, आश्चर्य वाटे मला॥ ३
चित्ताला पुसलें कशास्तव बरें आहे इथें मांडिलें।
हें नैसर्गिक दृश्य, कार्य कसलें आहे बरें योजिलें।
तों कोणी वदलें, निसर्ग उघडी या दर्पणाला स्वयें।
विश्वाचें प्रतिबिंब बिंबित इथें आहे न कांहीं दुजें॥४॥

आशा स्नेह असेचि भाव वितरी जो हृद्य आम्हांवरी ।
ज्यांहीं कष्टद जीवनास अमुच्या येते महामाधुरी ।
होतां अस्त जशी प्रभा, रविस्थिती भावावबोधामुळें ।
हो अज्ञेय अदर्शनीय तरिही अस्तित्व त्याचें कळे ॥५॥

भावें सिंचियली समान वसुधा, ऐकोनि वाक्यास या ।
मेघाभेद कशास येथ दिसतो, ही येत शंका महा
टाकावी क्षण एक दृष्टि दिसुनी येईल त्या दर्पणीं ।
त्याचें उत्तर हा निसर्ग सजला राहे न शंका मनीं ॥६॥

फेकी एक रसा रवी उमटतो मेघावरी वेगळा ।
कां कीं मेघस्थिती समान नसते खालींवरी भेद हा
व्योमीं उच्च जरी मनोहर असें होईल रूपांतर ।
होता नीच स्थिती, कभिन्न दिसतो काळा महा भेसुर ७

२० सप्टेंबर १९१७.

## तल्लीनता

[ पत्र वाचतांना तल्लीन झालेल्या एका मुलीच्या मुखाकडे पाहात असतां खालील विचार सुचले.]

(चाल:—राजहंस माझा निजला०)

तव प्रसन्न दिसतें वदन । सौख्यद तें घडलें काय ।
गुंतली कुठे ही वृत्ती । नेत्र हे कशावर फिरती ।
मोद हा कशाला करितो । वदनावर स्वैर विहार ।

हास्याची एक लकेर।
ही मधेंच उठते स्वैर।
खोलुनी हृदयमंदीर।
आविष्कृत वदनावरतीं। हृत्सौख्य जाहलें थोर ॥१॥
निरखुनी पाहिलें हातीं। सानसें कायसें दिसलें।
काज ह्या हृदयसौख्याचें। उघड तें कळोनी आलें।
पाहुनी मनोरम दृश्य। हें चित्त रमुनिया गेलें।
लागली मनाला आर्ती।
लागले नेत्र ज्यावरती।
तें निधान येतां हातीं।
आनंदसिंधु हेलावे। याच्यांत नवल तें काय ॥२॥
तैशीच ठेविली दृष्टी। हृदयंगम दृश्यावरती।
ती लहरी आनंदाची। विरली तों वदनप्रांतीं।
तन्मयता पुरती बाणें। संमूढ बने चिद्वृत्ती।
बाह्याचा पडला विसर।
लोपला भाव तो दूर।
जाहला चित्तसंयोग।
वाटलें पत्र हें आहे। अदृश्य भेट जीवांची ॥ ३ ॥

## कल्पनेंतील भरारी

[समरांगणांत जाऊन समशेर गाजविण्याचा प्रसंग हिंदुस्थानांतील लोकांवर यापुढे कधीं



२८७८.

येईल, हें जरी सांगतां येत नाहीं तरी असा प्रसंग आल्यास पुरुषांची व स्त्रियांची पहिली मनःस्थिति काय होईल याची कल्पनेला भरारी मारतां येते तशा एका प्रसंगाचें हें कल्पित चित्र आहे.]

(चाल:—राजहंस माझा निजला०)

विगत हो सदाची आशा। जाहलें हृदय हें भग्न।
ढळली निराशा भाळीं। मन निराशेंत हें मग्न।
कल्पनेंतलें साम्राज्य। कल्पनेंत जाइल विरुन।
दुष्प्राप्य तरी चिंतून। तेथेंची होणें लीन।
गुंगणें अशक्यामध्यें। हा असे मनाचा धर्म।

त्या तंद्रींतिल सुखस्वप्न।
अदृश्यामधलें दृश्य।
कल्पनाकृतक आभास।

जरि सर्व भासमय तरिही। नाहीं का बोधप्रद हें।

* * *

"सैन्यांत ब्रीद राखाया। जाउनी शिपाई बनणें।
घातली अमोलिक संधी। फायदा करोनी घेणें।
वाटतें योग्य चित्ताला। अनुमती तुवां मज देणें।"

प्रश्न हा येउनी पडत।
जो अपूर्व पांच पिढ्यांत।

दचकलें तयानें चित्त ।
जरि चित्त दचकलें त्यानें । तरि सहज नवल हो
कसलें ॥ २ ॥
आजन्म शस्त्र दृष्टीनें । पाहिलें कसें तें नाहीं ।
कल्पना एक समराची । पुस्तकावरोनी येई ।
नोकरी खूप पैशाची । हें ध्येय जयांचें होई ।
त्या खऱ्या हिंद अबलांनीं ।
युद्ध हा शब्द ऐकोनी ।
दचकावें जावें भिउनी ।
हा परिस्थितीचा झाला । परिणाम दोष कोणाला ? ॥

४

चिंतिलें कधीं ना स्वप्नीं । प्रत्यक्ष येउनी भिडलें ।
अस्पष्ट चित्र समराचें । लोचनांपुढुनिया हालें ।
पाहतां भयानक दृश्य । हें चित्त भ्रमोनी गेलें ।
तें क्रीडांगण कालाचें
भेसूर जिथें यम हांसे ।
उघडिलें द्वार मृत्यूचें ।
सांगतां नये कोणाला । आदळेल केव्हां घाला ! ॥

५

दृश्य हें भयानक दिसतां । थरकांप जिवाचा झाला ।
सुखनिधान प्राणापरतें । रक्षावें उचित जयाला ।
अनुमती जावया देणें । उचित काय स्त्रीधर्माला ।

त्या काळाच्या दाढेंत ।
त्या अग्नीच्यी खाईंत ।
मृत्यूच्या जाभाड्यांत ।
मी सांगूं कां जायाला । जीवीच्या सर्वस्वाला ॥ ”

६

आवेग दूर होतांची । या अपूर्व नव भीतीचा ।
झाहला सुरू मग झगडा । कर्तव्याकर्तव्याचा ।
हा एक पतिस्नेहाचा । बंध दुजा तर राष्ट्राचा ।
समसमान दोन ठिकाणीं ।
श्रेष्ठत्व कशा देवोनी ।
वागणें इष्ट मनुजांनीं ।
हा विचार मानसिं आला । बदलला झोत चित्ताचा ॥

७

“सुखदुःखाची सहभागी । म्हणवितें जगीं अपुल्याला ।
एकरूप भावें असतां । भेद काय कर्तव्याला ।
कर्तव्यपराङ्मुख व्हाया । सांगूं कां भुलुनि सुखाला ।
म्हणविसी उच्चतम भाव ।
कां स्वार्थाला हा वाव ।
कां हृदया भीतिस ठाव ।
तें श्रेय तयाचें सत्य । त्यापुढें तुच्छ मत्सौख्य ॥

८

गोखलखां बापू गेले। क्षात्रतेज झालें सुप्त।
नामर्द रानटी काळे। जाहलें लुप्त अस्तित्व।
आत्मतेज दावायाचा। जाहला समय हा प्राप्त।
या ऐशा मंगल कालीं।
कल्पना अशुभ तुज आली।
कां हृदया तुजला रुचली।
हो तयार कर्तव्याला। कां कातर रणमरणाला॥

९

हा माझा दुबळा जीव। धांवतो सुखाच्या पाठीं।
परि तात्कालिकप्राप्तीनें। येईल श्रेय कां हातीं।
होईल सुखें संसार। साधेल काय सं-सार।
या चिमण्या घरट्यामधुनी।
भवबंध ताड तोडोनी।
भास्करीं झडप घालोनी।
येइल कां होउनि विजयी। ठेवील देह वा कार्यीं॥

१०

हा ठरला निश्चय; पटली। जाणिव मग कर्तव्याची।
स्वयमेव अंतरीं स्फुरली। सुप्त ज्योत वीरस्त्रीची।
तन्मयता पुरती बाणें। मी पत्नी वीरवराची।

नयनांचें जल घेवोनी ।
संकल्प मनानें करुनी ।
हें उदक अंजली भरुनी ।
सोडितें. मातृकार्यार्थ–। वेचतें मुदित मी यांत ।।

## जीवितकोडें

[ ही कविता लिहिण्याचें तात्कालिक कारण ता. ५।६।१९ रोजीं हिंगणें येथील कॉलेजच्या गॅदरिंगचें वेळीं झालेलें प. वा. प्रो० वा. ब. पटवर्धन यांचें व्याख्यान होय, येवढें नमूद करावेसें वाटतें.]

१

या जीवाला जीवित कोडें जन्मांतरिं तरि सुटेल कां ?
ही जीवाची हुरहुर जाची काज तियेचें कळेल कां ?
कांक्षित हृदया मिळोनि,चित्ता ठाव तयाचा दिसेल कां?
जी जीवाला जाणिव झाली उदित खरी ती ठरेल कां ?
जगदाकारीं जीव गुंतला, मोहावस्था फिटेल कां ?
निश्चित करुनी, बोधें पटुनी, त्या ठायीं मन स्थिरेल कां?
जीव धांवतो त्या सौख्याचें स्थान अचल तें दिसेल कां?
या जीवाची तळमळ साची सौख्यानंदीं विरेल कां ?

अंतःसौख्या बाह्य पसारा पुरा कधीं तो पडेल कां ?
भासें परि हें तसें ठरोनि, पटोनि हृदया टसेल कां ?
पूर्णानंदीं, आशावादी हृदय कधीं हें बनेल कां ?
या जीवाला जीवितकोडें जन्मांतरिं तरि सुटेल कां ?
दिक्कालानें प्रतिहत नाहीं तें मज तें सुख मिळेल कां ?
सौख्यासाठीं दैवालंबन नको ! त्रासले सुटेन कां ?
'तुकया' रमला त्या दिव्याचा लेशभर तरी मिळेल कां ?
त्या लेशानें जीवन माझें आनंदानें भरेल कां ?
तीव्र निराशा, कार्यमूढता, दैववाद हा सरेल कां ?
त्याच मोहिनीमधुनी माझी कार्यस्फूर्ति स्फुरेल कां ?
प्रवृत्तीची उज्ज्वल ज्योती निवृत्तीतुनि निघेल कां ?
कर्तव्यास्तव कर्तव्याची जाणिव चित्तीं उठेल कां ?
भाव 'तुक्याचा', कार्यक्षमता 'दासांची' ती वठेल कां
या उभयांचें मीलन माझें जीवन बनुनी जाईल कां ?
पूर्णानंदी, आशावादी हृदय कधीं हें बनेल कां ?
या जीवाला जीवितकोडें जन्मांतरिं तरि सुटेल कां ?

६ जून १९१९.

मराठी ग्रंथ संग्रहालय, नं. ........ ता. ........ ठाणे.

# मंगलाष्टकें

[ शिरवळ मुक्कामीं झालेल्या एका विवाहप्रसंगा-
निमित्त खालील अष्टक लिहिलें होतें.]

१

अस्ताद्रीवर एक टेकुनि पदा, कां भास्करा! थांबला ?
प्राची! लावुनि दीप मंगल तुवां कां अक्षता फेकिल्या?
सांगे वात हळूंच; काय कळुनी पर्णावली डोलल्या ?
आहे सोत्सुक कां निसर्ग? जन हा कां ह्या स्थलीं पातला?

२

धेनू पान्हवल्या सवत्स बघती कां थांबुनी कौतुकीं ?
स्वस्थाना परते; मधें थबकते कां पाखरांची तती ?
मोदें सज्ज समस्त कां विखरिला सद्गंध पुष्पा! रजीं ?
आहे मंगल काय आज विबुधीं तें मांडिलें गोरजीं ?

३

आहे मंगल मांडिलें, सुसमयीं या, या, त्वरा कीं करा
भो देवी! नभमंडलस्थ, स्थलिंच्या, तैशा जलींच्या, चला।
या साऱ्या वनदेवता, मिळुनिया अर्घ्यास या स्वीकरा।
चिंता मंगल, द्या शुभाशि उभयां, निर्विघ्न सिद्धी करा॥

४

चारी आश्रम धारणार्थ गणिला जो मूळ मन्वादिकीं।
जेणें राहतसे समाज; घडते राष्ट्रादिकांची स्थिती।
तत्सर्वाश्रमवंद्य, यत्सुखभरें हे जीव लोभावले।
तें हें आज विवाहमंगल मुदें आहे चला मांडिलें॥

५

चंद्रा रोहिणि, सागरास सरिता जोडोनि ऐक्याप्रती।
यावज्जीव परोपकारनिरतीं जीवित्व हें साधिती।
तोची आज सुयोग, त्याच सुफला दावो अम्हा संप्रती
नाहीं हें स्वसुखास; केवळ नसो ही स्वार्थवृत्तीं रती॥

६

जातां भिन्न दिशा धरोनि जमले जीवौघ हे शेवटीं।
होवोनी उभयांस पोषक नव्या मार्गा क्रमूं लागती।
अन्योन्याश्रय हा उदंड बलवान कालोदधीशीं झुळो।
वाहोनी चिरकाल तद्वयकुला समृद्धि वृद्धी मिळो॥

७

अज्ञानांधतमांत गाढ दडली, दारिद्र पंकीं फसे।
लागे फांस गळा अहर्निश जिच्या मुक्तीस याचीतसे।
थांबे धीर धरी अगे भरतभू ! ही पातली दंपती।
उद्धारार्थ तुझ्या सदैव झटण्या देई शुभाशीप्रती॥

८

राहो संतत प्रेम होउं उभयां हें सौख्यदायी सदा ।
वाढो संतति, संपदा, यश, लया जावोत सर्वापदा ।
वेचों हें द्वय सारसर्व अपुलें त्वत्सेवनीं योजुनी ।
घेवो नित्य शुभाशि मंगलकृती माते ! तुला वाहुनी ॥

यशवंत नरसिंह केळकर.

# सुखाचें माहेर

दूर जगाहुनि दूर जनाहुनि दूर उपाधींपासून ।
सौख्य राहिलें दूर निसर्गीं शोधा तेथें जाऊन ॥

लतासुमांची हलती डुलती हंसरी सृष्टी निर्मियली ।
हृदयराग-रागिणी गाउनी विहग-गणांनीं बोलविली ॥

वाऱ्याचें अलगूज ऐकतां लतानिकुंजीं सुमनांची ।
कळी खुलोनी सुधा पाझरे उचंबळोनी हृदयींची ॥

वाऱ्याच्या झोल्यावर झोंके घेत हांसतीं तीं सुमनें ।
लता लोटिती लांबवूनि कर कोमल अपुले प्रेमानें ॥

मधुर मंजिरी कर्णीं खोवुनि रसालशाखा पालवत्या ।
रसालफल–कंदुकासवें बहु तोषित होती कशा न त्या !

वाऱ्यावरतीं फेऱ्या घालित फिरणाऱ्या त्या विहगतती
शिवाशिवी पाहण्यास त्यांची पाण्यावर लाटा उठती ॥

हिरव्या हिरव्या हिरवळ कुरणीं चरत्या देखा गाइगुजी
गोप गुराखी कशास व्हावें कळेल तेव्हां तुम्हांस जी ॥

पाषाणाच्या पर्वतांतही प्रेम दाटतें येथ किती ।
हृद्‌गंगा बोळल्या तयांच्या पहा तयांना नसे मिती ॥

आनंदाची प्रभात फुलते निसर्ग–लक्ष्मीच्या जगतीं ।
तन्मय होती 'द्विज' जे जगतीं 'निर्माण' कवी ते ठरती ॥

## येवढीच तुजला भाक

पल्लवांत किसलय झालों
कुसुमांत सुकोरक बनलों। चिर् कला।
हरिणांत पोत नव चपल
मी शकुंतशावक लोल। जाहलों।
स्रोतांत स्रोतजलकणिका
अति तलम तरल नव झुळका। वायुची।
तूं पिता। निसर्गा अतां।
सदय तत्त्वतां। वत्सला माता। वत्सला माता।
फिरवी मज धरुनी हातां। यापुढें॥

२

तोडिले बंध जगताचे
वाचे ! न पुन्हां घे त्याचें। नांवही।
दरकुटी जीर्ण पर्णकुटी
दिव्य तो वास मजसाठीं। यापुढें।
धवल तें उडुप वा तिमिर
जें असेल तें मज चीर। यापुढें।
परि ध्यास। एक जीवास।
वास वनवास। असावा एक। असावा एक।
येवढीच तुजला भाक। ईश्वरा॥

---

उडुप=चांदणें.

# एका चुकलेल्या पांखरास

[ चालः–श्रीमंत पतीची राणी० ]

भिराभिरा वरी फिरताती
चिवचिवाट कलकल करिती
डाहळ्या धरुनि चरणांत
दोल्यावर डोळे घेती
बोलवीत जगता बसती
परि तुला न कोणि बहाती
पसरला पसारा वरती
फुकटची गोड ओरडती
कोणी न हांक तुज देती
एकेकापुरती प्रीती
एकेकाची या जगतीं ॥० १

एकही फळावर चोंच
रोंखिली न पोरा! पुरती
निश्वासश्वास–मात्रानें
थरकतीं पिसें तव नवतीं
नीडांत नीज निववावी
आजची तुझी ही रीती

देखिली न माझी पुरती ।
काशि मुकली हातोहातीं
काय बापुड्या ही नियती
आधारबंध तव तुटले
पेटलें तुला जग सगळें ॥ २

## दोल्यावरी बसोनी । जीं गाइलीस गाणीं.

[ चालः—प्राणासमान प्यारी० ]

दोल्यावरी बसोनी । जीं गाइलीस गाणीं
दोल्यासवें अजोनी । हेलावतात कानीं ॥
निःशब्द शांत सरसीं । मृदुमंद वात हलुनी
नवलोल वीचिलेखा । उठती जशा उलोनी
तैशा लकेर–लाटा । येतात मंदवहनीं
हलवूनि हृत्‌लटाका । हरतात भान अजुनी ॥१॥
अभिषेक मंगलाचा ।– आसार ओसरोनी
स्वन शांत होत. वाटे । गेले विरोन व्योमीं
गिरिकंदरीं परी त्या । उठतात स्रोतसरणीं
त्या दिव्य गायनाच्या । तानाच घेत फिरुनी
चुकल्या तुझ्या लकेऱ्या । हृदयांत या झरोनी
दुखवूनिया दिलाला । हरतात भान अजुनी ॥ २ ॥

## श्रवणिं कां न ये बासरी

तीन सांजा टळुनि गेली । श्रवणिं कां न ये बासरी ॥
॥ हरीरे ॥
दिवस संध्यामिषें बाळा । देखण्या तुला थबकला ॥
॥ हरीरे ॥
ओढ धरिली वांसरांनीं । कां न ती तुला वांसरा !
॥ हरीरे ॥
ओढित ओढी । जीवा तोडी
वृत्ति वसल्या रे तुजवरी । श्रवणिं कां न ये बांसरी॥१॥
दिवस सगळा खेळचाळा । कां न तो तुला
पुरवला॥ भज्जुनिरे ॥
खेळ माझा मांडलासी । अवखळा ! कसा
असा छळसी ॥ हरीरे ॥
चांदवा ही घरा परते । ये घरा तुला सांगते ॥
पोरट्या ॥
वेळा का ही । खेळायाची ? ॥
जीव जगला रे तुजवरी । श्रवणिं कां नये बांसरी ॥२॥
पांखरांचा चिंवचिवाटा । लोपला मघा कोटरीं ॥
पांखरीं ॥
चांदण्याचा चादरीं त्या । चांदण्या सुखें
झोंपल्या ॥ कधिंच रे ॥

मेघ काळा कांबळा हा। चंद्र तार करें ओढितो
॥ झोंपण्या ॥

पयधाराही। या तव विरहीं
कुरकुरती ये लवकर घरीं। श्रवणिं कां नये
बांसरी ॥ हरीरे ॥

## पोरी !

विपुळपल्लवीं आतुडलेलें
नीड जसें पक्षाचें।
बहलकुंतलीं तसें गुंतलें
बालबिंब वदनाचें ॥

उजळ उषेपरि प्रसन्न होतां
टवटवीत तव वदन।
चिंवचिंव करिती चिमुकलेच ते
शब्दपोत आंतून ॥

उगाच काढुन इवल्या चोंचा
आंत पुन्हां लपतात।
अर्धस्फुट तैं बोल बोबडे
अधरपुटीं स्फुरतात ॥

केतकापरी गारै गोवुनी
गळ्यांत माझ्या हात।

तोंड भिडवुनी तोंडा अविरत
कारिशि किती आकांत ॥
मिळे न प्रत्युत्तर तव बोला
तरि न तुला अवसाद ।
उत्कंठित कोकिळा घालिते
उत्कटतर मग साद ॥
तुझ्या जोगता अन्य न येथें
चेलगडी रंगेल ।
असमंजस बोलुनी तुझ्यापरि
जो तुजला रमवील ॥

## मी मनांत बाला झालें !

[ बाळपणीचा काळ सुखाचा आठवता घडिघडी.]

[चालः—अजि हौस जिजीची पुरवा०]

मी मनांत बाला झालें
घेतलें सुखाचे झोले॥ धृ० ॥
पंजरीं सोनियाच्याही
झुरतसे सारिका पाही
मानसांतलि हंसाचे
लावुनी पंख सोन्याचे

हे विलास ल्याहून। काळाच्या शेतांतून।
बाल्याच्या चाफ्यांवरून
सर्व झाड मीं बोलविलें
मी मनांत बाळा झालें०॥ १ ॥
दिवस तो डोइला येतां
घेउनी शिदोरी हातां
शेताच्या मार्गी जातां
ही भाकर वोपिलि ताता
शाळूच्या शेतांतून
मोदानें फिरलें फिरून
फिरतांना शेतांतून। पांखरें दिलीं उडवून।
पांखरापरी परतून
झाडाच्या सावलिं आलें
मी मनांत बाला झालें०॥ २ ॥
दिंवस तो बुडाया आला
घेतला घडा पाण्याला
गोपांनिं गाइ वळवील्या
पाजाया पाणोठ्याला
डोइला घेउनी भारे
परतले शेतकरि सारे
त्या सवें गीत गाऊन। वाट ती थोडकी करून।
मी घरा अलें परतून

मग गाइ पिळाया वसलें
मी मनांत वाला झालें०॥ ३ ॥

वांसरें अधिर तीं झालीं
ओढ घ्यावयाला सजलीं
लांबवूनि अपुल्या माना
चाटिती गाइगुजि त्यांनां
जणुं हितगुज करिती कांहीं
" येऽग ती माझी बाई ! "
पाजुनि त्या प्रिय पोरांना। मी दूर करुनि दोघांना।
तोडिलें म्हणुनि का मजला
शैशवांतुनि ओढियलें ?
मी मनांत बाला झालें० ॥ ४ ॥

## माझा आवडता ससा

जरी बैसले मंगळ येउन लोल लोलशा नेत्रांत।
तरी न बेटा कराल आहे, कातर साऱ्या मुलखांत ॥ १
नीच बासन। देखुनि जगतीं, छातीच्या या खाचेंत।
काळिज लपलें तेव्हांपासुनि, भयभीतीनें धडधडत ॥२
तसाच माझा निर्मळ प्रेमळ, प्रेमाविसांवा असा ससा।
निषादपाशें भीत कंदरीं अद्रीहृदयीं दया जसा ॥ ३

हिमासम जरी शुभ्र शोभतो हिम प्रकृती जरि याची।
तरी जागती गोड ती किती ऊब आंतल्या जीवाची ।। ४

कानकेवडे उभारुनीया सान मान हा डोलवितो।
प्यार सोवत्यापाशीं हितगुज करितांनाही थरथरतो ।।५

कापसापरी मऊसऊशा कायेच्या या पिशवींत।
प्राणांची मखमाली पिशवी किती कोंवळी ती आंत! ।।६

पेशी फोडुन जगतीं आला तरी दिसे हा पेशीच।
आंत नांदतो जीव एकला घालुन पेशीचें कवच ।। ७

जणों दह्याची कवडी किंवा मूक मुकुलिकाच हा दिसे।
मूक दिसे पर फार बोलका या जीवाचा दोस्त असे ।।८

निरपराध गुणमंडित असलीं वसुंधरेचीं सुभूषणें।
नाहक छळिलीं आजवरी त्या जन-विश्वाचें जळों जिणें९

## पहांटच्या पांवसांतील गवळ्याचा पोर

नभास देखनि दगा ढगांनीं डुंडुभ दुमदुम दुमदुमिळे
कातर ताराराण्यांचें त्या क्षणींच पाणी हो झालें ।। १

पर्जन्यानें भिजुनी वारे तुषार विखरित सुस्मुरती
निरुद्धकंठीं अस्फुटशब्दीं ओष्ठ तयांचे पुटपुटती? २

ओली ओली चिंब जाहली सगळी हिरवीचार धरा
पल्लवांवरी डाव मांडिती शिवाशिवीचा जलधारा ।। ३

पायदळीं पाडिलीं द्रुमांनीं पिकलीं पानें तीं भिजुनी
कुंद गंध राहिला तरंगत सुंद अंतरालामधुनी ॥ ४

स्वकरसहस्रीं लपवी भास्कर अनंत व्योमांतिल मुक्ता
झेप घालुनी हिसकाया त्या, स्पर्धा ज्यांची किति
म्हणतां ? ॥ ५

विहंग वेजित, वेज वर्षतां पर्जन्यमिषें, तेच स्वतां
विन्मुख सन्मंगलाभिषेका सन्मुख निलया होत
अतां ॥ ६

प्रेमळ माता लता, सुमांनां पर्णलपदरीं झांकविती
परी पदर सारुनी हलुच तीं सुमुखें अपुलीं भिजवीती ७

वामस्कंधीं कावड चढली मान मुरडिली डाविकडे
पुढ्यांत लावुनि दृष्टी दुडक्या चालीं चालत गोप पुढें ८

थुइ थुइ थुइ थुइ नाच नाचतें शुभ्र दुग्ध त्या चरव्यांत
क्वचित् कुठें उसळुनी थेंब वर सर बाहेरी ओसरत ९

पाउलवाटीं गवतें लवलीं, लवलीं त्यांवर रानफुलें
रानफुलांचा फेस दुभंगित जासी तूं मोठया डोलें १०

हंस पोहतां जशी मागुती क्षणैक जलपदवी स्पष्ट
पाउलवाटा दिसुनी होती क्षणैक तुजमागुनि नष्ट ११

मधुर सूर घालतो एकला एकतारिवर एकसरें
पाउलवाटीं त्याच चालसीं त्याच गतीनें प्रतिदिनिं रे १२

ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता.

निर्मळ प्रेमळ परममंगला ! पुण्यवास तव वनवास
घातित पापमय हृत जगतानें कसा लाविला तुज
फांस ? ॥ १३

गिरिशिखरावर वास असावा निर्मळसलिलस्रोतांचा
त्या अनघांनीं कसा चुरावा चरण पापमय
नगरांचा ? ॥ १४

निसर्गांतल्या निष्पापा ! कां जगास येशी भेटाया
तेजस्तारा तुटोनि येतां शिळा बने त्याची काया ॥ १५

पापी विश्वाच्या सहवासें चंद्राही क्षय लागतसे
पटुप्रसर तो कलंक ग्रासुनि पक्षावधिं त्या टाकितसे १६

गुलाम केलें पापें पुण्या, जड जगतानें निसर्गता
निसर्गपुष्पा ! तुजला आम्हीं दिधली निष्ठुर
परवशता ॥ १७

किती वाटतें बंध तोडुनी येथिल तुजमागें जावें
डोंगरपाठीं ओढ्याकाठीं गाइगुरांतुन विचरावें ॥ १८

## एक दृश्य

न्हालेले मृदु केस भोंवर जे पाठीवरी लोळती
बांकाया सजतांच ते तव मुखा झांकावया लागती
गालांना रुचतो न नाजुक जरी संसर्ग त्यांचा तुळा
ग्रीवाभंग कपोतिकेपरि तुझा धिक्कारितो त्यांजला

## सायंतारा

समोरच्या कौलारावरुनी
ठळक चांदणी टंवकारोनी
चकित लोचनें लक्षित कोणी
स्थिरतेजाच्या स्निग्धशरांनीं विकच करी नेत्रांस ॥
विशाल व्योमीं विविक्त तारा
तेजाच्या पसरूनि विष्टरा
जणों महाश्वेता ही अपरा
करुणालापा आळआळवुनि विद्ध करी हृदयास ॥

## पाऊस

वृक्ष, वल्लरी–विकल जाहले
विहगविरुत नीडांत निमालें
विपक्ष होउनि, भाते तुटले—
वाऱ्याचे. जग मुकेंच पडलें।
तुझी एकसारखी चालली झिम झिम झिम झिम झिम १
उदास अंबर, धूसर अंतर
अधरधरा धाराहत कातर
उच्च शैलशिर, नीच नदीरय
वस्तुजात विरघळुनि वोळले।
काय तुझी ही झिम झिम झिम झिमं २

धरणीवरतीं विटपें उठलीं
विटपांवरतीं पानें फुटलीं
पानांवरतीं फुलें उमललीं
रुचिर मुकुट मातींत पाडुनी
रडसी वरती झिम झिम झिम झिम ३

आकाशावर हंड्या चढल्या
मेघांच्या तटतटोनि तुटल्या
जलकणिका–लाह्याच उसळल्या
बरसात खरी आनंदाची
गोपगणाची झिम झिम झिम झिम ४

कड्याकड्यांतुन उड्या टाकिती
धडाधड किती नवस्रोततती
करांत कर घालुनी संगतीं
लपावयाला घळीघळींतुन
खळखळ करिती–झिम झिम झिम झिम ५

आसपासच्या वडावडांतिल
गाइगुरींचे कदंब निश्चल–
मूर्त प्रीत कीं दयार्द्रतेंतिल
नेत्र मिटोनी कर्ण उभवुनी
तन्मय; ऐकत झिम झिम झिम झिम ६

## दृष्ट तयांला श्वास लागली

बारिक बारिक सतार-तारां-परि मंजुळ बोलशी
अखंडित सूत्र दिव्य निर्मिशी ॥
अभिनव नाजुक मृदुहासाचे गजरे गाहिरे सखे
गुंफिशी त्यांत एकसारखे ॥
चंद्रिकेपरी परिहासाचा सुधासेक त्यावरी
कळ्या मग कोमतील कां तरी ? ॥
वाटतें सारखें हुंगावें त्यांजला
हृदयाचा गाभा करुनि पूर्ण मोकळा
कोंडुनी धरावा परिमळ हा आगळा
दृष्ट तयांला श्वास लागली न कळे मुग्धे ! तुला
चुंबुनी झांकूं दे तरि मला ॥

## मुसळधार पाऊस

तेजाळ विजेची सुरी
कचाकच घाव घालितां उरीं
उरीं फुटोनी हंबरताती दीन मेघ अंबरीं ॥ १
राहिला भरोनी घोर घनांचा वरी
घनघोर कोसळे पाउस सरिवर सरी
भिरभिरा भोंवरे घेत वात भीतरीं
काळोखाचा चिखल जाहला पाउस कसला तरी ? २

विचकुनी भयानक दाढा त्या वरिवरी
चकचकाट–लचके वीज काढिते वरी
गडगडोनि अंबर गर्द चाललें वरी
कहरधार ही थडथड नाचे संतत छातीवरी ॥ ३

जाहला पिंजरा जगताचा केवळ
टांगलें विजेच्या सळीस त्याचें दळ
भोवंडे देई भीम–वात–मंडल
क्षणा–क्षणाला तुटेल वाटे कडकडतां वर नभ ॥ ४

## गोड आठवण !

पदापदाला निर्भर अभ्रा सितांचला सावरी
इंदुकला अंबरीं तशी तव मोहमूर्ति मोहरी
अकृतमधुरशा मंद पदन्यासें हृदया तुडविलें
म्हणुनि साजणी ! येउनि सहसा करास मीं कवळिलें
वात झोंबतां आम्रमंजिरिस मोहर घळघळ गळे
कंपित वपुवर रोमांचाचे सर सुंदरि ! वोळले
श्रावणमासीं हिरव्या शेतीं ऊन–सांवली पडे
लज्जाहर्षें पुरेपुरे तुज तैसें झाले गडे !
टवटवीत जे गुलाब गहिरे गालांवर रेखिले
जड निश्वासें तुझ्याच सुंदरि ! उमलाया लागले

कर ओढुनि वांकुनी रोखिलें नम्र मुखाला जसें
स्तिमित जाहले विशाल लोचन लाजेनें राजसे !
शशिलेखांपरि अर्धनिमीलित नयन तुझे भासले
पुसट चांदणें लाजेचें लाजरें मुखीं पसरलें

## गोविंदा निशा नुरली

[ भैरवी ]

गोविंदा निशा नुरली
मुरलीनें प्राशिली ।।

शाम घटावर श्वेत दह्याची
लाहि फुटावी तशी उषा—
पसरलि ही निशा सरली
मुरलीनें प्राशिली ।।१।।

काळी कपिला गहन त्रियामा
करधारांनीं पान्हवली
पसरलि ही निशा सरली
मुरलीनें प्राशिली ।। २।।

## वक्रविधुकोर ही–

[ चालः—आज नंदलाल० अगर होय संसारतरु० ]

वक्रविधुकोर ही शाममंडलयुता
उपजवी कौतुका चित्तहर चारुता ।। धृ०।।
गगनगंगेहुनी । पयकलश कीं भरुनि ।
चालली परतुनी । बालवनिता अतां ।। वक्र० ।। १
स्थूल घट स्थापिला। चिमुकल्या कटितला।
शुभ्र कर वेष्ठिला। कलशकंठा अतां ।। वक्र० ।।२

## यदृच्छेस !

बाल्याचें नभ सावकाश रमुनी उल्लंघिलें स्वेच्छया
आतां या क्षितिजीं निवास मजला अत्यल्पसा नेमिला
बाल्याचे रमणीय प्रांत इथुनी येतात लक्षावया
अज्ञातीं गढलें भविष्य न दिसें कांहींच त्याचें मला
वाटे भीति मना म्हणून--उमटे ही तीव्र इच्छा मनीं
जावें कीं परतूनिया पुनरपी पाहाड ओलांडुनी
अन्यस्पर्शित पांखरापरि मला थारा तिथें कोठला
आशंका शिवतां मनास गमतें हो पोरकें पोरकें
नेत्रांनों ! नच चित्र तें वळुनिया आशादृशा पाहणें
अश्रूंनों ! उमटे तरी पुनरपी टाका पुसोनी बळें
टोंची अंतर हें कसाब सजले "बोले विसांवा पुरे—
उद्दिष्टास तुझ्या उशीर तुजला होणें मुळीं ना बरें
उद्दिष्टास ! परी मला न उमजे तें कोठलें कोणतें
यदृच्छे ! तुज ठाउकें जरि तरी पोचीव तूंची तिथें

# बंदिवान हरिण

[ 'मॉडर्न रिव्ह्यू'मधील Call of the woods
या चित्रावरून ]

हांक पुन्हां आली, वनींची हांक पुन्हां आली
बावरली वृत्ती क्षणैकचि तन्मयता ल्याली
वटपत्रापरि ते उभवुनी कान ताठ दोन्ही
विशाल नयनांनीं पाहतो टक ह्या लावोनी
मान उंचवीतो देउनी ध्यान वनीं बघतो
मुहूर्त निश्चळसा राहुनी कान पुन्हां देतो
कोण दिसे त्याला दिसेना कोणाहि नयनाला
हांक ऐकुनी ती जीव परि बांधुनिया नेला
दूर दूर गेली हांक ती खोल विरळ झाली
कालवलें पोटीं घेतली झांप त्याच काळीं
ध्यान कसें व्हावें पाश तो गळ्याभोंवताळीं
हिसकितांच झाला पाश तो फांस गळा अवळी
घे हिसके हिसके बिचारें एकवटूनि बळ
उपहासें हांसे गळ्यांतिल ती घुंगुरमाळ
लाट उचंबळतां उचंबळतां वर फेस फुले
फेसाची लेखा मुखावर त्याच्या मग उमले.



ग्रंथालय
दा. क्र. 2८८९.

## पतंग

अस्मानावर कोण वागडे–
कवडाशा परि इकडे तिकडे ?
खालींवरतीं मधेंच मुरडे
मधेंच हा स्थिर मुरका चंदिर[1] पुनवेच्या अंत्यातपांत कीं
या अंगावर त्या अंगावर
कलतो डुलतो मधेंच सुंदर
गिरके खाउनि मुहूर्त हा स्थिर
फूलपांखरूं मिटुनी चिमगीं पक्षपुटें जें स्थिर पर्णावर॥

## बालमित्र

प्रातःकालिक जीं नवीन कुसुमें बागांत उल्हासतीं
प्रेमानें सरसें[2] निरागस तदा त्यांचीं किती चालतीं
माळ्यानें खुडतां पुढें न कळतें जाती कुणाच्या करीं
काळानें नकळे कुठें दवडिलें तें बालमित्रां दुरी॥
बाल्याच्या प्रहरांत शैलशिखरीं अच्छोदकाचे सर
क्रीडा रम्य सवें मिळोनि करिती होवोनिया निर्भर
एकामागुन एक भिन्नगतिनें जातात ते पांगतां
तैसें दुर्लभ हाय दर्शन मला झालें गड्यांनो! अतां।

१ चंदिर=चंद्र. २ सरसे=क्रीडा.

## मृत्यु कसा हवा ?

व्योमाच्या कुहरांतरांत शिरण्या जैं द्वार तो चंद्रमा
तैसें जीवन मानवी मज गमे काळांत डोकावया
काळाच्या विनिगूढ गीत-ततिचा प्रारंभ हें जीवन
मृत्यूनें स्व-रयेंच जें सृजियलें तें पात्र हें जीवन
वाऱ्याच्या वहनें फुलोनि सुमनें येती नव्या यौवनीं
वाऱ्याच्या वहनेंच तीं गळुनिया जातात वेलींतुनी
देहींचें नवजीवतत्त्व सरतां कोमेजतां जीवन
काळाच्या लहरीसवें सहज हें जावो गळोनी सुम
काळाच्याच अखंड सूत्रवलयीं जीं जीवितें गुंफिलीं
हांसोनी क्षणमात्र अन्य घडिनें होणार कोमेजलीं
आहे जीवन हेंच जीवन तुझें काळा ! न त्याची क्षिती
रोगानें मरणें नको मज गमे त्याचीच मोठी भिती
जैसा वृक्ष निशागमीं सहजसा होईल निष्कूजित
तैशी ही तनु शांत होउं सहसा त्यागोनिया जीवित
येतो चंद्र नभावरी उगवुनी दृष्टीस चोरूनिया
येवो मृत्यु तसा जिवा उजळण्या ही याचितों मी दया

---

१ रय=प्रवाह.

## उमलुनि वायां जाउं नको![1]

उमलुं नकोग उमलुं नको, उमलुनि वायां जाउं नको ॥

नाजुक नाजुक रम्य मनोहर
अस्फुट हें तव कोडें जोंवर
विमल माधुरी टिकेल तोंवर
मुग्धपणाचें स्वप्न भंगतां, भग्न तुझे होतील मनोरथ

धाचूच्या झुंबरांत ज्योती
स्निग्ध भोंवतीं पसरी दीप्ती
आकाशीं वा जशी एकटी
शुक्राची तेजाळ तारका, तशी तुझी ग मोहनमूर्ती!

या जगताच्या दृष्टीआडुनि
अजात पक्षी कोटरांतुनी
लक्ष लावुनी लक्षी अवनी
अभिनव अर्धस्फुट रूप तुझें,आतुडतें अंतरास माझ्या!

बोल बोलण्या बालक सजलें
वर्ण पूर्ण ते व्यक्त न वठले
बाल-काकली तसेंच गमलें
रूप तुझें, तूं उमलुनि आतां व्यर्थचि वायां जाउं नको!

---

१ अजात=पंख न फुटलेला. २ आतुडतें=आकर्षितें.

ह्रात झांकला काढुनि नेला
मधुर सुधेचा भरला पेला
कां सजलिस तूं ओतायाला
सुधा संपतां चंद्रकोर ती,जात न कां काळोखा मिळुनी?

वारा कुजबुज करितो कानीं
तुझ्या भोंवतीं आळी घेउनि
बसला. म्हणतो जा उमलोनी
क्षणांत मातीमोल करोनी,टाकिल परि मातींत मिळवुनी

अविचारानें जाशिल फुलुनी
पळांत दुसऱ्या जाशिल गळुनी
शोभे तारा–जोंवर गगनीं
तुटोन जातां निष्ठुर जगतीं कोण तयाची कणव[१] करी?

## घातला फांसा तव जीविता !

[चालः—नरजन्मामधिं नरा करुनि घे०]

महदपराधी खराच सखया ! प्रेमें तुज स्पर्शितां
घातला फांसा तव जीविता ।।धृ०।।

रूपसुंदरा ! मुखर पांखरा ! कलकाकलि परिसतां
अंकिलें मन झालें तत्त्वतां ।।

१ कणव=कींव.

चूताच्या नव नील पालवीपरी तुझ्या श्यामला
देखतां पक्षपुटां कोमला ॥
श्यामलपल्लवपुटीं खुलावी दंवबिंदूची युती
तसे तव लोचन हे शोभती ॥
चोरटें रूपडें देखुनि तव चिमखड्या !
वोढविला कर हा नकळत माझा गड्या !
स्पर्शुनी लागलों या मार्गा वांकड्या
आम्रतरूचा तुराच गळला वर पाखर पसरतां
घातला फांसा तव जीविता ॥ १ ॥

कुतुकातिशयें कुरवाळिलें तुज थोपटिलें चुंबिलें
कपोलीं नेऊनिया लाविलें ॥
पुन्हा पुन्हां तव चोंच चिमुकली अंगुलिनें स्पर्शिली
नासिका तनुशीर्षा टेकिली ॥
चंचळसलिलागळीं प्रकंपित पक्षपुटें ओष्ठिली
जशी नव अर्धोन्मीलित कळी ॥
मग पुरता मनिंचा सोस तसा तत्त्वतां
कौतुकें देखण्या तुज उडुनी धांवतां
स्थापिलें करतळीं 'मुक्त, सख्या जा अतां'
परि नच हलसी परि नच डुलसी स्वस्थ कसा तूं अतां
घातला फांसा तव जीविता ॥ २ ॥

क्षणैक बसते पुळ्यांत उडते हातवेरि मुरडुनी
मनापरि येत येत परतुनी ॥
होकारुनि बारिक बोला तव चिवचिव जी बोलली
उडाया शिकवित तुज बैसली ॥
मायाजाळीं कटाक्षटांके देउनि तुज गुंफुनी
टाकिलें जिनें लतांतरुतुनी ॥
ती पळा आगळीं माय न येथें अतां
आवरुनी मायाजाला-तव जीविता
घेउनी निघाली हृतभाग्या रे हृता !
स्वातंत्र्याची कठिण कसोटी द्विज इतकी लावितां !
घातला फांसा तव जीविता ॥ ३ ॥
बहुलपल्लवित अति रोमांचित कलेवर-तरूवरीं
सुखें तूं नीज हृदयकोटरीं ॥
स्मृतिशेषा ! तुज आठवणींचे गोड घांस वाढुन
यापुढें मीच तुला भरविन ॥
सुखदुःखाच्या सांवलींत वा उन्हांत तूं सोबती
जीव हा देहाच्या संगतीं ॥
जागवीं उषा प्रतिभेची तूं पांखरा ।
रिझवीं तिज काढुनि चतुरा ! मधुरा गिरा
स्वच्छंद क्रीडुनी ओसरता दिन खरा
उतर कोटरा आटोपुनियां पक्षपुटें मागुता
घातला फांसा तव जीविता ॥ ४ ॥

## झोंप कशी आली ?

हिमवर्षावापरी टिपुर चांदणें अंगणीं खुले
मुलें मन भुरक्या मोहामुळें
शांतीच्या रसरंगा भरती भरली; भासुर स्फुरे
चांदणें फेसच वरती उले
उदासमानस खिन्नगात्र मी तेथ जसा पहुडलों
क्षणांतचि मोहाकुळ जाहलों
जड नयनांवरतीं झांपड लागे पडूं
निद्रेचें मग तें गोड रातपांखरूं
पक्ष्मांचीं पांखें पसरुनि लागे उडूं
क्षणांत उडुनी उंच उडालें स्वप्नाच्या अंबरीं
तेथली वर्णुं काय माधुरी ? ॥

## माझा जाईचा वेल

आशेचा वठला पुन्हां विटप कीं ल्येई नवी पालवी
तैसा पालवुनी फुलोनि झुलतां शोभा तुला ये नवी
प्रत्यूषीं फुलतां फुलें, नवनवें लाधे तुला यौवन
म्हालेल्या कुसुमांपरी भरुनिया ओलावले लोचन.

२

ज्या हातें तुज वाहिलें चिमुकल्या, बागांत या माझिया
प्रेमें सांजळतां सन्यांतुनि जया मीं पाजिलें रे पया

पुष्पांनीं लढतां अतां रुचिर हे उन्मेष तूझे नव
झालें आज कृतार्थ अंतर तसें विश्रांत माझे कर.

३

सूर्याच्या जळत्या झळी करपुनी देतील सारी मही
दृष्टिक्षेपहि दग्ध होउनि जधीं जातील तेजोवहीं-
वारेही बनतील पोत जळते ऐशा निदाघांतरीं
तूझ्या शीतळ सावलीस बसुनी गाईन गाणीं वरी.

४

चंद्राचा गहिरा गुलाब वदनीं, गंगोदकाच्या परी-
लेई पातळ पातळास धवला त्या चांदण्याच्या, वरी;
ध्वांताचा कचपाश सारित करें येतां सखी यामिनी
भेटाया तिजला सजेन सखया! तूझ्याच कुंजांतरीं.

५

मेघांच्या क्षितिजावरी उमटुनी गंभीर धीराकृती
छाया आयत पालवूनि भुवनीं अंधार विस्तारती
दिग्द्वारें अवरोधुनी घनतती वाऱ्यासही रोखिती
ऐसे दुर्दिन दाटतां तव मुख-श्री फुल्ल होईल ती.

६

घेवोनी परडी करांत खुडण्या तूझीं सुमें कोमल
येतां त्या चिमण्या उडोनि तुझिया कुंजांतुनी जातिल
त्यांच्या पेलवपादपीडनिं तुझे दोलावुनी अंकुर
मोत्याच्या स्खलतील बिंदुकणिका तारांतुनी जें दंव.

७

कोठें होऊनि राहिली दिसतसे दाटी फुलांची, कुठें
भृंगाचुंबित एकटेंच सुम तें वाऱ्यावरी डोलतें;
कोठें बाळकळ्या फुलां लगटुनी डोकावितां मोहिती
भावंडांस कडेवरी धरुनिया वाटे मुली खेळती.

८

होतां कातरवेळ ती परतुनी येतां घराला गुरें
ओढ्याच्या झुळत्या जळांत शिरतां तीं गोजिरीं वांसुरें
पाण्या लावुनिया मुखा उचलिती माना पुन्हां त्या वरी
तैशीं रम्य फुलें सुदर्शन तुम्ही वाऱ्याचिया ओसरीं.

९

जातां ओसरुनी प्रकाश सगळा व्योमांतरालांतुनी
घेतां मेघमुखें क्षणेक उजळा सानंद संध्यागमीं
रेखा तांबुस ज्यावरी उमटल्या ऐशा कळ्या कोवळ्या
तान्ह्यांच्या चिमण्या मुठीच मिटल्या होतील तैं
मोकळ्या.

१०

धारासार तुला कधीं झोडपुनी मोठ्या बळें टाकितां
आधारा धरणीस घट्ट धरण्या बाहू तुझे वांकतां
किंवा पुष्परजांपरी बरसुनी उद्ग्रीव होतां शिरें
शोभा भिन्न जरी तरी नच बरी, आनंद रूपांतरें.

## काळोखाच्या मखाखालतीं फुलुनी बहरा अला मोगरा

काळोखाचें हें कळसूत्री
द्वार सरकतें क्षितिजामधुनी
व्योमांगणिं तारका जमोनी
अगणित बघती चकित लोचनीं
परी खालतीं ही जड अवनी
गर्द तमीं या गेली गढुनी;
धडपडते, परि समीरलहरी
काळोखाला उचंबळोनी
गुदमरुनी टाकितात तिजला १

अथांग सागरतळांत दुसरी
वरुणाची वनराइच नटली
वृक्षवल्लरी पक्षावांचुन
हालचाल ती शब्दावांचुन
जड तें सगळें विरुनी गेलें
दिव्य तेवढें उदया आलें
काळोखाच्या मखाखालतीं
फुलुनी बहरा अला मोगरा २

काळोखाचे विशाल कातळ
उभे ठाकले भोंवति निश्चळ

वाऱ्याचे पाझरती ओझर
एकांताचे निगूढ कंदर
पर्णपुटांचा उटज एकला
त्यांत एकली जड जगताला —
विन्मुख रमसी तापस-बाला
निश्वासांनीं नुसत्या अपुल्या
प्रदेश करिसी तुझा अंकिला ३

सुप्त बालका कुशीस घेउनि
तशीच निजली वा जी रजनी
अपरात्रीं परि नीज निवोनी
सहज सुखाची जागृति येउनि
काळोखांतहि उघडुनि डोळे
स्वानंदाशीं अपुल्या खेळे
कलिकांच्या मृदु मुष्टि वळोनी
हर्षानें जणुं गेले ढवळुनि ४

नक्षत्रांच्या गळल्या स्वाती
तमोदधीच्या तळांत मोतीं—
पुष्पें अगणित फुलुनी जाती
पाणिदार तव विशेष जाती
पल्लवपुटशुक्तिकेंत शोभसि
म्हणुनि मोतिया तुजला म्हणती. ५

## 'हरिणी' आणि 'चमेली'

जातां मी जवळी लगेच पुढतीं ये पाउलें चालुनी
दावें संपुनि जाय बापुडि तिच्या यावें कसें हो मनीं !
नेत्रोनी जमिनीस मान मग ती तेथेंच ती हालवी
प्रेमानें मज पालवी 'क्षणभरी खाजीव' हें दर्शवी

२

प्रेमाचें अगदीं भुकें मुख तिचें बाहूंत आलिंगुनी
मानेनें मग घासतां हळुहळू संतोषली जी मनीं
नीलस्निग्ध विशाळ दृष्टि मिटुनी कीं आंसवें आवरी !
स्थूल स्थूल उदास हेंच सुचवी उच्छ्वास तीचा परी

३

अभ्रांच्या बुरख्यांत वीज उजळे ती मंदभासा जशी
हस्तस्पर्शेंहि हालका पुलक तें देई किती हो तिशी
लोटाया विधुबिंब दूर, जळिंच्या लाटा जशा घोटती
'द्यावा हात दुरी' असेंच मजला रोमांच ते सांगती

४

होतां वेळ सकाळ सांज अगदीं पाजावया पाडसा
झाली तन्मय प्रेमपूर्ण नयनें ज्या पाहतां पाहतां
लावीना मुख वैरणीस नुसतें ती सारखी हुंबरे
हांका दीर्घ तिच्या अजून परत्या झाल्या न कानांतुनी

५

राता रंग जयास फार खुलवी पाठीवरी पांडुर
तेणें जें सुकुमार शुभ्र, दिसलें भारीच चेतोहर

शोभे लाल गुलालची उधळिला कीं पुष्पगुच्छावर
रक्तपृष्ठ उषाच वा उतरुनी आली स्वयें भूवर

६

काळेभोर विशाळ, मर्मरपुटीं कीं नीर तें निर्मळ-
डोळे स्निग्ध जयाकडे निरखितां स्नेहाळतें अंतर
फेनस्पर्धि, पराहुनी मृदुलता घे रम्य वक्षःस्थळ
तें माझें मज लाडकें त्यजुनिया गेलें दुरी ना तर ?

७

मागें वागडते मुहूर्त पळते पाहाट रात्रीकडे
गाई मागुन धावले. मन अतां कां मागुती धावडे ?
गेलें पुष्प गळोनि ज्यांतुनि अशा त्या वेलनालापरी
भासे त्या सम वांसराविण अतां हें दाम भूमीवरी?

## बालगंधर्वास

[ मंदाक्रांता ]

बोला बोला विमल उमले स्निग्धदंतावली ती
वाटे मुक्ता भरुनि भरुनी अंजली, ओष्ठ देती
संगीताच्या मृदुल लहरी मुक्त त्या नाचतां जी
ताजी ताजी उमलुनि वरी येत ही फेनराजी ॥
कीं हास्याचें विमल अगदीं हास्य ही दंतपंक्ती
कीं कंजाच्या मधुरमुखिं ही दाटली बिंदुपंक्ती
दुग्धस्निग्धा प्रणयस्मरणी पुंडरीकप्रियेची
मुक्तामाला तुज मवसली राजहंसा ! तियेची ? ॥

2858

REFBK-0002879

REFBK-0002879